नवी आशा नवी दिशा

# सार्वमत


## नंदूरबारमध्ये दगडफेक आणि जाळपोळ

**नंदूरबार–** नंदूरबार शहरात दोन गटात तणाव निर्माण झाला. त्यामुळे जोरदार वाद झाला. हा वाद इतका टोकाला पोहोचला की, दोन्ही बाजूने जोरदार दगडफेक आणि शिवीगाळ करण्यात आली. जाळपोळही झाली. संबंधीत घटनेमुळे परिसरातील नागरिक प्रचंड भयभीत झाले. नेमकं काय सुरु आहे ते समजणं नागरिकांना कठीण होवून बसलं. यावेळी दगडफेकीमुळे काही नागरिक जखमी देखील झाले. परिस्थितीचं गांभीर्य ओळखून कुणीतरी पोलिसांना या घटनेची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांचा मोठा फौजफाटा तातडीने घटनास्थळी दाखल झाला.

## आर अश्विनचा शतकांचा सिक्सर

**चेन्नई–** टीम इंडियाचा स्टार ऑलराऊंडर आर अश्विन याने आपल्या घरच्या मैदानात धमाका केला आहे. अश्विनने बांगलादेश विरूद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात शतक ठोकले आहे. अश्विनच्या कसोटी कारकिर्दीतील हे सहावे तर घरच्या मैदानातील दुसरे शतक ठरले आहे. अश्विनच्या कसोटी कारकिर्दीतील हे सर्वात वेगवान शतक ठरले. एम. ए. चिदंबरम स्टेडियममध्ये आयोजित करण्यात आलेल्या या सामन्यात अश्विनने शानदार बॅटिंग केली. बांगलादेशचा ऑलराऊंडर शाकिब अल हसन याने टीम इंडियाच्या डावातील ७८ वी ओव्हर टाकली. अश्विनने या ओव्हरमधील तिसऱ्या बॉलवर एकेरी धाव घेत शतक झळकावलं. अश्विनने १०८ बॉलमध्ये १० चौकार आणि २ सिक्ससह हे शतक केलं.






## महत्त्वाचे

### अचानक नाकाबंदी करून वाहनांची नेवासा पोलिसांकडून तपासणी



**नेवासा (तालुका वार्ताहर)–** नेवासा शहराला येऊन मिळणारे मार्केट यार्ड मधमेश्वर चौक, श्रीरामपूर रोड व खुपटी रोड येथे नेवासा पोलीस ठाण्याच्यावतीने ५ वाजेपासून नाकाबंदी करण्यात आली. या नाकाबंदीमध्ये ३ अधिकारी, १६ पोलीस अंमलदार व ३० होमगार्ड सहभागी झाले होते. नाकाबंदीमध्ये संशयित व्यक्ती, चोरीची वाहने, चोरीचा माल, संशयित वाहने, दारू-गांजा यांची वाहतूक, अवैध शस्त्रे इत्यादीची तपासणी केली. दोन तासांमध्ये दुचाकी, चारचाकी वाहने मिळून ७५० वाहने तपासण्यात आली.

### अनुसूचित जमाती आरक्षणासाठी धनगर समाजाचे नेवासा फाटा येथे उपोषण सुरू



**नेवासा (तालुका प्रतिनिधी)–** धनगर समाजाची अनुसूचित जमाती (एस. टी.) आरक्षणाची त्वरित अंमलबजावणी करून प्रमाणपत्र देण्यात यावे या मागणीसाठी धनगर समाजाच्यावतीने नेवासा फाटा येथून १ किलोमीटर अंतरावरील त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलानजीक असलेल्या मोकळ्या जागेत दि.१८ सप्टेंबरपासून आमरण उपोषणा सुरू केले आहे. अशोकराव कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रल्हाद सोरमारे, बाळासाहेब कोळसे राजू तागड, रामराव कोल्हे, देविलाल मंडलिक, भगवान भोजने हे उपोषणास बसले आहेत. उपोषणस्थळी भेट देणाऱ्या धनगर समाज बांधवांनी 'येळकोट येळकोट जय मल्हार', 'आमच्या हक्काचे आरक्षण मिळालेच पाहिजे',' उठ धनगरा जागा हो, आरक्षणाचा धागा हो' अशा घोषणांनी परीसर दणाणून सोडला. महाराष्ट्र राज्याच्या सत्ताधारी पक्षासह सर्व राजकीय पक्षांनी धनगर आरक्षण प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र आजवर आश्वासन पूर्ण केले नाही. तरी सरकारने दिलेले आश्वासन किमान शेवटच्या कॅबिनेटमध्ये तरी पूर्ण करावे, धनगर आरक्षणाची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी उपोषणार्थींनी केली आहे.

# सामाजिक बदलांसाठी पिम्सचे महत्त्वपूर्ण काम- राज्यपाल

## गुजरातचे समाजसेवक सावजी ढोलकी यांचा डॉक्टर ऑफ सायन्सने सन्मान

**लोणी (वार्ताहर)–** प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सने ग्रामीण आणि आदिवासी भागात सामाजिक बदल घडवणारे महत्वपूर्ण काम केल्याचे गौरवोद्गार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काढले. याच समारंभात गुजरातचे समाजसेवक आणि हिरे व्यापारी सावजी ढोलकिया यांना विद्यापीठाच्यावतीने डॉक्टर ऑफ सायन्स देऊन सन्मानित करण्यात आले.

लोणी, जि. अहमदनगर येथील प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसच्या १८ व्या पदवीदान समारंभात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महसूल, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारंभात उद्योजक आणि समाजसेवक पद्मश्री पुरस्कार सन्मानित सावजी ढोलकीया यांना त्यांच्या सामाजीक आणि पाणी संवर्धनाच्या अतुलनिय कार्यासाठी मानद डिलीट पदवी प्रदान करण्यात आली. त्याचबरोबर ९४१ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यात मेडीकल सायन्सचे ३३५, डेन्टल शाखेचे १२५, फिजोओथेरपी १३२, नर्सींग २३७, पब्लिक हेल्थ सायन्स ११२ आणि पीएचडीचे ९ असे पदवी, पदव्युत्तर आणि पीएचडीच्या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन म्हणाले, ग्रामीण, आदिवासी भागात आरोग्य सेवेची मोठी गरज आहे. वैद्यकीय शिक्षण ग्रामीण मुलांना मिळायला हवे. हे काम अनेक वर्षांपासून पिम्समार्फत होत आहे. ही उल्लेखनीय बाब आहे. येथे शिक्षण पूर्ण करून पदवी प्राप्त केलेल्या मुला-मुलींनी जीवनात यश मिळवण्यासाठी परिश्रम घ्यावेत, असे त्यांनी सांगितले.



**समाजसेवक सावजी ढोलकिया यांना डॉक्टर ऑफ सायन्स प्रदान करताना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन. समवेत ना. विखे, डॉ. राजेंद्र विखे व अन्य मान्यवर.**

सावजी ढोलकिया म्हणाले, पिम्सचे माझ्यावर हे मोठे ऋण आहे. त्यातून उतराई होण्याचा मी प्रयत्न करीन. मी गुजरातमध्ये जलसंवर्धनाचे मोठे काम केले. मात्र माझा सन्मान पिम्सने केला. पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना संदेश देताना ते म्हणाले, मी सर्वोत्तम आहे, मी करू शकतो, देव सदैव माझ्या पाठीशी आहे, मी विजेता आहे आणि आज माझा नवीन दिवस आहे. ही पाच सूत्र जीवनात पाळली तर यश तुम्हाला नक्की मिळेल.

ना. विखे पाटील म्हणाले, पिम्सचे कार्य दीपस्तंभासारखे आहे. आता सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभे राहणार आहे. त्यासोबतच अवयव रोपण शस्त्रक्रिया होऊ शकणार आहेत. त्याची पायाभरणी आज झाली. हे नवे दालन खूप महत्वाचे असेल. पदविधारकांनी नवे संशोधन आत्मसात करून सर्वसामान्यांना वैद्यकीय सेवा द्यावी. यावेळी कुलपती डॉ. राजेंद्र राजेंद्र विखे पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना पिम्सच्या वाटचालीची माहिती दिली. कुलगुरू डॉ. व्ही. एन. मगरे विद्यापीठाचा अहवाल सादर केला. समारंभाला विश्वस्त सुवर्णाताई विखे पाटील, मोनिका सावंत-इनामदार, ध्रुव विखे पाटील, एम. एम. पुलाटे, अध्यक्ष कैलास तांबे, नंदकिशोर राठी, कुलसचिव अरुणकुमार व्यास, अधिष्ठाता राजविर भलवार, के. व्ही. सोमसुंदरम, सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक, विद्यार्थी, पालक, प्रवरा परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ. चेतन पाटीलचा जामीन अर्ज फेटाळला

**सावंतवाडी–** मालवण राजकोट किल्ल्यावरील शिव पुतळा कोसळल्याप्रकरणी न्यायालयीन कोठडीमध्ये असलेला संशयित बांधकाम सल्लागार डॉ. चेतन पाटील याचा जिल्हा न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळला आहे. नौदल दिनानिमित्त मालवण राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यात आला होता. तो दि. २६ ऑगस्ट रोजी कोसळला. यानंतर शिवप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे. दरम्यान सार्वजनिक बांधकाम सहाय्यक अभियंता अजित पाटील यांनी मालवण पोलीस ठाण्यात शिव पुतळा शिल्पकार जयदीप आपटे आणि बांधकाम सल्लागार डॉ. पाटील यांच्या विरोधात तक्रार दाखल केली. त्यानंतर डॉ. पाटील याला कोल्हापूर येथून अटक करण्यात आली होती.

# निमगाव खैरी येथे तिघांवर तलवार व चॉपर हल्ला

## जखमींवर नगर येथे उपचार सुरू; तिघांविरोधात गुन्हा दाखल

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** श्रीरामपूर तालुक्यातील निमगाव खैरी येथे एका तरुणावर तसेच त्याचा चुलतभाऊ, चुलते यांच्यावर तलवार, चॉपरने जीवघेणा हल्ला करण्यात आला. यामध्ये हे तीघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर नगर येथील खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. याप्रकरणी तीन जणांवर तालुका पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निमगाव खैरी येथील पुरुषोत्तम रामदास भागडे, सर्जेराव भागडे तसेच ध्रुव भागडे असे जखमी झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी पुरुषोत्तम भागडे यांनी तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून दि. १३ रोजी आम्ही मोटारसायकलवरून बल्ब घेण्यासाठी गावात आलो होतो. आम्ही सुमीत इलेक्ट्रीक दुकानासमोर गाडी लावून दुकानात बल्ब घेण्यासाठी गेलो, त्यादरम्यान एका लाल रंगाच्या स्विप्ट कारने आमच्या मोटारसायकलला धडक देऊन खाली पाडली. त्यामुळे मी त्यांना म्हणालो गाडी व्यवस्थित चालवत जा, त्याचा राग येऊन गावातीलच प्रसाद भाऊसाहेब वदक, वाघुजी नानासाहेब शिंदे, दीपक बाळासाहेब तुपे हे तिघेही मोटारसायकल जवळ आले. लगेचच प्रसाद वदक याने माझ्या तोंडात मारली. तेव्हा चुलतभाऊ संतोष मध्ये आला. त्यालाही दीपक तुपे, वाघुजी शिंदे यांनी मारहाण केली. प्रसाद वदक



याने गाडीमधून चॉपर व तलवार काढून तलवार त्याने वाघुजी शिंदे याचेकडे दिली. तर चॉपरने प्रसाद वदक याने माझ्या पोटात, हातावर, गालावर सपासप वार केले. दीपक तुपे याने मला पकडून ठेवल्यामुळे हालचाल करता आली नाही. त्यामुळे वाघुजी शिंदे याने तलवारीने माझ्या डोक्यावर वार केला. हे बघून चुलतभाऊ संतोष हा भयभीत होऊन घराकडे पळून गेला. मी त्यांच्या तावडीतून निसटलो आणि शेजारी असलेल्या आरोग्य केंद्रात गेलो. त्यावेळेस सदर ठिकाणी माझा चुलतभाऊ ध्रुव शंकर भागडे तेथे आले. ते काही विचारायच्या आतच प्रसाद वदक याने चॉपरने त्यांच्याही पोटात वार केले. मी त्यांना वाचविण्यासाठी गेलो असता वाघुजी शिंदे याने मला पुन्हा धरून ठेवले. तेवढ्यात माझे चुलते सर्जेराव भागडे हे देखील घटनास्थळी आले. त्यांच्यावरही दीपक तुपे याने तलवारीने वार केला. यामध्ये आम्ही तीघेही जखमी झालो. हा प्रकार झाल्यानंतर प्रसाद वदक याने जमलेल्या लोकांना तलवार फिरवून कुणीही पोलिसांना फोन केला तर त्याचेसुध्दा हेच हाल होतील, असे म्हणून गावात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यामध्ये प्रसाद भाऊसाहेब वदक, वाघुजी नानासाहेब शिंदे, दीपक बाळासाहेब तुपे यांच्याविरुध्द भा. दं. वि. कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३५१ (३), शस्त्र अधिनियम ४, २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास तालुका पोलीस करत आहेत. यातील आरोपींना तत्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# आमदार गडाखांमध्ये तालुक्याचे प्रश्न सोडविण्याची क्षमता- नरेंद्र घुले

**कुकाणा (वार्ताहर)–** आजपर्यंत प्रत्येक रोटेशनला हक्काचे पाणी आणून देण्याची धमक फक्त आमदार शंकरराव गडाख यांच्यातच असून याचा अनुभव सर्वांनी घेतला आहे. तसेच प्रश्नांची जाण असणारे व तळमळीने काम करणारे हे नेतृत्व असून त्यांच्यामागे खंबीरपणे उभे रहा, असे आवाहन माजी आमदार नरेंद्र घुले यांनी कुकाणा येथील जाहीर मेळाव्यात केले.

तालुक्यातील टेलच्या गावांनाही आ. शंकरराव गडाख यांच्यामुळे रोटेशनचे पाणी पोहचते यामुळे तालुक्यातील शेती फुलवून तालुक्याचे नंदनवन झाले असल्याचे नरेंद्र घुले यांनी सांगितले. नेवासा बाजार समितीच्या कुकाणा उपआवारात ११ कोटींच्या व्यापारी संकुलाचा शुभारंभ माजी आमदार नरेंद्र घुले यांच्याहस्ते झाला. अध्यक्षस्थानी आमदार शंकरराव गडाख होते.

प्रास्ताविकात बाजार समितीचे अध्यक्ष नंदकुमार पाटील यांनी आतापर्यंत केलेल्या कामाचा लेखाजोखा मांडला. घोडेगाव येथील



१६ कोटींचे काँक्रिटीकरण, कुकाणा येथे ११ कोटींचे व्यापारी संकुल, नेवासा येथे व्यापारी संकुल तसेच शेतकऱ्यांसाठी केलेल्या कामाची माहिती दिली.

माजी आमदार पांडुरंग अभंग म्हणाले, आ. शंकरराव गडाख यांच्या प्रयत्नातून कुकाणा येथे उभारण्यात आलेल्या व्यापारी संकुलामुळे कुकाणा व परिसराच्या अर्थकारणाला गती मिळणार आहे. माजी खासदार यशवंतराव गडाख पाटील, स्व. मारुतराव घुले पाटील यांनी नेवासा तालुक्यातील गावागावांत विकासाची गंगा आणली असून तालुक्याच्या शेवटच्या टोकापर्यंत विकास पोहचविण्यासाठी आ.शंकरराव गडाख सदैव प्रयत्नशील आहेत.त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांना आपण सर्वांनी साथ द्यावी, असे आवाहन माजी आ. पांडुरंग अभंग यांनी केले

अध्यक्षीय भाषणात आ. गडाख यांनी सांगितले की, २० वर्षांपूर्वी चालू केलेल्या कांदा मार्केटचे राज्यात नाव आहे. शेतकऱ्यांची फसवणूक होऊ देऊ नका, त्यांना सुविधा द्या. येथील हमाल, मापाडी तसेच व्यापारी शेतकऱ्यांची मुले आहेत. सर्वांनी मिळून शेतकऱ्यांना न्याय द्या. कुकाणा येथील संकुल युवकांसाठी चालू केले

> अभंग साहेब, मी व शेखरभाऊ आम्ही पण आमदार होतो. आम्हा तिघांना राज्यमंत्रिपद मिळाले नाही. शंकरराव थेट कॅबिनेट मंत्री झाले. याचा आम्हा सर्वांना आनंद झाला. तालुक्याच्या व जिल्ह्याच्या विकासासाठी ही मोठी गोष्ट आहे. शंकरराव हे आगामी काळात पुन्हा एकदा मंत्री होतील व तालुक्याला सुवर्णकाळ येईल, असे नरेंद्र घुले यांनी सांगताच उपस्थितानी टाळ्यांचा कडकडाट केला.

असून यामुळे बाजारपेठ नक्कीच मोठी होण्यासाठी मदत होईल. राज्यात अनेकांना सूतगिरणींना मंजुरी दिली पण आपल्या ठेवी असतानाही राजकीय आकसापोटी आपल्याला टाळले गेले . ५०० युवकांना यात रोजगार मिळाला असता परंतु स्थानिक विरोधक विकास कामात अडथळे आणत असतात. रस्ते, वीज व विकास कामासाठी मंजूर निधीही यांनी थांबवला परंतु न्यायालयात जाऊन कोट्यवधीची कामे अंतिम टप्प्यात आली असून पुढील काही महिन्यांत ही कामे मार्गी लागणार आहेत.

याप्रसंगी काशिनाथ नवले, देसाई आबा, मच्छिंद्र म्हस्के, दत्तात्रय काळे, तुकाराम मिसाळ, दादासाहेब शेळके, जनार्धन पटारे, नानासाहेब तुवर, कडूबाळ कर्डिले, अशोक मिसाळ, अजित मुरकुटे, एकनाथ कावरे, रावसाहेब कांगुणे, राजेंद्र कदम, शिवाजी कोलते, तुकाराम मिसाळ, एकनाथ कावरे, राजू परसैय्या, अशोक मंडलिक, प्रभाकर कोलते, नानासाहेब नवथर, कृष्णा शिंदे, अमोल कोकणे, बाळासाहेब गोरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व आजी-माजी संचालक, विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार संचालक अण्णासाहेब पटारे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. रेवणनाथ पवार यांनी केले

# निपाणी निमगाव ते वाटापूर रस्त्याचे काम अखेर सुरू

**नेवासाफाटा (वार्ताहर)–** गेल्या पाच दिवसांपासून तामसवाडी येथे निपाणी निमगाव ते वाटापूर या रस्त्याचे काम सुरू करण्यात यावे यासाठी उपोषण आंदोलन सुरू करण्यात आले होते. रस्ता कामास प्रारंभ करण्यात आला. त्यामुळे ग्रामस्थांच्या उपोषण आंदोलनास यश मिळाले. या यशामुळे ग्रामस्थांकडून आंदोलनकर्ते व या आंदोलनास सहकार्य करणाऱ्या सर्वांचा सत्कार करण्यात आला. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता यांनी स्वतः आंदोलनस्थळी भेट देऊन माहिती घेत सदर कामास त्वरित मुदत वाढवून घेत ठेकेदारास त्वरित कामास प्रारंभ करण्याच्या सूचना केल्या.

यानुसार आज रस्त्याच्या कामास सुरुवात करण्यात आली. यामुळे पाच दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनास यश मिळाले व आंदोलन सोडविण्यात आले. यावेळी ग्रामस्थांनी आंदोलनकर्ते संजय कोलते, सारंगधर फोफसे, संभाजी माळवदे, संतोष काळे यांचा सन्मान केला. संजय कोलते यांनी हा विजय माझा नसून हा गावातील नागरिकांचा असल्याचे तर संतोष काळे यांनी गावातील कुठलीही समस्या सोडविण्यासाठी आम्ही ग्रामस्थांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू, असे स्पष्ट केले.

यावेळी संभाजी जगताप, वैजनाथ जाधव, बाबा फोफसे, रमेश कोलते, दत्ता कर्जुले, भाऊसाहेब जाधव, जालिंदर कर्जुले, महेश कर्जुले, गोवर्धन आयनार, भास्कर मोटे, पपू गोसावी, संजय गांधी, शंकर कर्जुले, आप्पा आयनार, शिवाजी जगताप आदींसह तामसवाडी, वाटापूर येथील ग्रामस्थ उपस्थित होते. सारंगधर फोफसे यांनी आभार मानले.

नवी आशा नवी दिशा सार्वमत

हे दैनिक मुद्रक व प्रकाशक राजेंद्र कृष्णराव सोनवणे यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. एन.११, एम.आय.डी.सी, अहमदनगर येथे मुद्रित करुन प्लॉट क्र. एन. ११, एम.आय.डी.सी, अहमदनगर ४१४१११ येथे प्रसिध्द केले आहे. ● संपादक- ✻ अनंत सा. पाटील : ☎ (०२४२२) २२२४६४,२२२६२९. फॅक्स : २२२७९४. अहमदनगर कार्यालय : ☎ (०२४१) २४३११०३/०४ फॅक्स : (०२४१) २४३११०५. R.N.I Regi. No. 31816/1976. पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. रजि. नं. बी.आय.आय./आर.एन.पी./एस.आर.पी./००३/२०२१-२३ (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)